# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

**प्रस्तावना :-**

**विषय :- भिवंडी मनपाच्या नव्याने बांधण्यांत आलेल्या बी.जी.पी. दवाखाना इमारतीचे आतील उर्वरीत काम करणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने बी.जी.पी. हॉस्पिटल दवाखाना परिसरात असलेले जुने नादूरस्त हॉस्पिटल तोडून नव्याने यु. सी. एस. सेंटर शासन निधी अंर्तगत बांधलेले आहे. सदर काम हे शासन निधीच्या अधिन राहून करावयाचे असल्याने इमारतीमध्ये आतील फॉल सिलिंग स्त्री पुरुष शौचालयाची कामे जिन्याचे रेलींग इत्यादी कामे शिल्लक राहिलेली आहेत. सदरची कामे करणे गरजेचे असल्याने याकामी रक्कम रु. ७१,७८,६२४/- इतक्या रक्कमेचे प्रस्ताव तयार करुन मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजुरीकरिता सादर करण्यांत आलेले आहेत. सदर प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी दिनांक २९/१२/२०२२ रोजी सदर कामास प्रशासकिय ठराव करून घेणेस मान्यता दिलेली आहे. मान्यता दिलेली आहे. त्यानुसार याकामी सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरिस्तव सविनय सादर.

**प्रशासकिय ठराव क्रं. :-** ९९ **दिनांक :-**29/12/2022

उपरोक्त विषयांकित कामी प्राप्त रक्कम रु. ७१,७८,६२४/- इतक्या रक्कमेचे प्रस्ताव तयार करुन प्रशासकिय मंजुरीकरिता सादर करण्यांत आलेले आहेत. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरिल कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७१,७८,६२४/- च्या प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका